ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २६ जानेवारी, १९५५ | अंक ४

## विविध माहिती

**पूर्व जर्मनीची व्यापारी कचेरी**—पूर्व जर्मन सरकारनें आपली एक कायमची व्यापारी कचेरी कलकत्ता येथें उघडण्याचें ठरविलें आहे. मुंबई येथें अशी कचेरी ह्यापूर्वीच उघडण्यांत आली आहे. पूर्व जर्मन सरकारचे व्यापारी प्रतिनिधि—मंडळ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. भारतीय उद्योगपतींकडून सिमेंटच्या व साखरेच्या कारखान्यांच्या कांहीं मागण्या प्रतिनिधि—मंडळानें नोंदवून घेतल्याची वार्ता आहे.

**पुरांना आळा घालण्याच्या योजना**—उत्तर-प्रदेश सरकारच्या पूर—नियंत्रण—बोर्डानें २ कोटि रुपये खर्च येणाऱ्या योजना मंजूर केल्या आहेत. ह्या योजनांना भारतीय सरकारकडून आर्थिक मदत देण्यांत येत आहे. मात्र, १० लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च येणाऱ्या योजनांचाच मध्यवर्ती सरकार विचार करतें. उत्तर—प्रदेश सरकारला ४९ लाख रुपयांचें कर्ज देण्यांत आलें आहे.

**माकडें मारण्यासाठी बक्षिसें**—उत्तर—प्रदेश सरकारनें राज्यांतील माकडांचा उपद्रव नष्ट करण्यासाठी एक योजना जाहीर केली आहे. ह्या योजनेप्रमाणें कमीत कमी ५ माकडे मारणाऱ्याला दर माकडामागें २ रुपये बक्षीस देण्यांत येईल. माकडाला मारून त्याचें प्रेत पुरणाऱ्याला आणखी ४ आणे देण्यांत येतील. ही योजना तूर्त एक वर्षभर अंमलांत रहाणार आहे.

**मोटार सायकलींचा कारखाना**—मद्रास मोटर्स लि. ह्या कंपनीनें इंग्लंडमधील रॉयल एन्फिल्ड मोटार-सायकल्स ह्या कंपनीबरोबर करार करून मोटार—सायकली तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखाना मद्रास येथेंच काढण्यांत यावयाचा आहे. कारखान्यांत तयार झालेल्या मोटार—सायकली लवकर बाजारांत येतील, अशी अपेक्षा आहे.

**अणुशक्तीनें उत्पन्न केलेली वीज**—अमेरिकेंतील कन्सॉलिडेटेड एडिसन कंपनी न्यूयॉर्क शहराला अणुशक्तीनें निर्माण केलेल्या विजेचा पुरवठा करणाऱ्या योजनेचा सध्या विचार करीत आहे. न्यूयॉर्कच्या नागरिकांना ही वीज नक्की कधीं मिळूं शकेल हें अनिश्चित असलें तरी ह्या कामांत तांत्रिक मदत करणाऱ्या कारखानदारांची बैठक घेण्यांत आली हें सूचक आहे.

**लग्नावर होणारा वायफळ खर्च**—पंजाब विद्यापीठाचे पाहुणे म्हणून डॉ. जोसेफ मॅकडॉनेल नांवाचे अमेरिकन प्रोफेसर आले आहेत. त्यांनीं भारतांत विवाह—प्रसंगीं होणाऱ्या खर्चाविषयीं आश्चर्य व्यक्त केलें आहे. स्वतःच्या विवाहाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, माझ्या लग्नाप्रीत्यर्थ सुमारें २५ रुपये खर्च झाले आणि विवाह-विधिला ८ मिनिटें वेळ लागला.

**खनिज—संपत्तीच्या शोधासाठी**—भारताच्या खनिज—संपत्तीचा अधिक कसून शोध लावण्यासाठी जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ह्या संघटनेचा विस्तार करण्यांत येणार आहे. येत्या पांच वर्षांत सुमारें ४ कोटि रुपये संघटनेसाठीं खर्च करण्यांत येणार आहेत. भूस्तर—शास्त्रज्ञांची संख्या १५० वरून ४०० पर्यंत वाढविण्यांत येणार आहे आणि आधुनिक पद्धतींचें संशोधन-साहित्यहि खरेदी करण्यांत येणार आहे.

**रेडिओची परवाना फी कमी होणार?**—रेडिओची परवाना फी कमी करण्याच्या प्रश्नाचा भारतीय सरकार विचार करीत आहे, असें समजतें. फी कमी करण्यांत आल्यास चालू सालच्या फीमध्यें मात्र फरक पडणार नाहीं. हल्ली प्रत्येक घरगुती रेडिओ-साठीं १५ रुपये फी देऊन परवाना घ्यावा लागतो.

**जहागिरदारांना मिळालेली नुकसानभरपाई**—हैदराबाद राज्य—सरकारनें जहागिरदारांच्या जहागिरी आपल्या ताब्यांत घेऊन त्यांना नुकसान—भरपाई देण्याचा कायदा केला होता. सर्व जहागिरदारांना मिळून १५·१८ कोटि रुपये सरकारनें द्यावयाचे होते. ह्या रकमेपैकी २९९·८५ लाख रुपयांची रक्कम आतांपर्यंत चुकती करण्यांत आली आहे.

**पंजाबमधील कापसाचें उत्पादन**—पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें पंजाबनें जितका कापूस पिकवावयाचा होता तो राज्यांत दोन वर्षे आधीच पिकविण्यांत आला आहे. पंजाबमध्यें कापसाच्या लागवडीखालीं ७,००,००० एकरांपेक्षा अधिक जमीन असेल असा अंदाज आहे. कापसाचें एकूण उत्पादन सुमारें ४,००,००० गांसड्या होईल.

**बँकेला परवाना नाकारला**—बँक ऑफ दिल्ली लि. ह्या बँकेला बँकिंगचा धंदा करण्याचा परवाना देण्याचें रिझर्व्ह बँकेनें नाकारलें आहे. परवाना नाकारल्यामुळें बँकेला बँकिंगचा व्यवसाय करतां येणार नाहीं आणि लोकांपासून ठेवीहि घेता येणार नाहींत.

**व्हॅक्यूम क्लीनरच्या संशोधकाचा मृत्यु**—व्हॅक्यूम क्लीनरचे संशोधक व विक्रेते मि. ह्यूबर्ट बूथ हे वयाच्या ८२ व्या वर्षीं मरण पावले. सतरंज्या व गालिचे साफ करणाऱ्या एका अमेरिकन यंत्रावरून त्यांना व्हॅक्यूम क्लीनरची कल्पना सुचली. त्यांनीं तयार केलेल्या पहिल्या यंत्राचें स्वरूप इतकें भीतिदायक होतें कीं पोलिसांनीं त्यांच्यावर कित्येकदां खटले भरले. १९०२ सालीं सातवे एडवर्ड ह्यांच्या राज्यारोहणाच्या समारंभाची रंगीत तालीम वेस्ट-मिनिस्टर ॲबे येथें झाली. तेथील कचरा त्यांनीं आपल्या यंत्रानें साफ केला व कीर्ति मिळविली.

## शेती–संशोधन संस्थांचा तौलनिक अभ्यास

ऑल इंडिया कौन्सिल ऑफ आग्रिकल्चरल रिसर्च ह्या संघटनेचे उपाध्यक्ष श्री. के. आर दामले हे चार भारतीय शेतकी-तज्ज्ञांना बरोबर घेऊन अमेरिकेंत गेले आहेत. अमेरिकेंत गेल्यावर तेथील तीन शेतकी-तज्ज्ञ ह्या गटांत सामील होतील. शेती-विषयक तज्ज्ञांच्या ह्या मंडळाचें कार्य भारतीय व अमेरिकन शेतीविषयक संघटना वे त्यांचें कामकाज ह्यांचा तौलनिक अभ्यास करण्याचें आहे. दोन्ही देशांतील शेतकी कॉलेजांचाहि असाच अभ्यास करण्यांत यावयाचा आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या तांत्रिक मदतीचा शेतीविषयक संशोधनाच्या शिक्षणाच्या कामीं जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल हें तपासून पहाण्याचा उद्देश ह्या भेटीमागें मुख्यतः आहे. ह्या संयुक्त-मंडळावर अमेरिकेच्या शेतकी-खात्याचा एक प्रतिनिधीहि राहणार आहे. मंडळानें पुढील कांहीं बाबींबाबत तपासणी करावयाची आहे. (१) भारतामधील व अमेरिकेमधील शेतीविषयक संशोधन संस्थांचे कार्य, संघटना व व्यवहार ह्यांचा तौलनिक अभ्यास करणें. भारतांत अशा प्रकारच्या ज्या संस्था मध्यवर्ती सरकार, राज्य–सरकार अगर विद्यापीठें ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं काम करतात, त्यांच्या कार्याचें एकसूत्रीकरण करण्यासंबंधीं उपाय सुचविणें, (२) प्रत्यक्ष शेतीचें काम करणाऱ्या भारतामधील लोकांना शिक्षण देण्याच्या दृष्टीनें भारतीय शेतीशिक्षण संस्थांनीं कसा कार्यक्रम आखावा तें सुचविणें, आणि (३) भारतामधील शेतकी-विषयक संस्थांच्या गरजांचा अभ्यास करून त्यांची सुधारणा घडवून आणण्यासाठीं शेतीच्या व संशोधनाच्या कोणत्या साधनांची आवश्यकता आहे तें सुचविणें.


---

## रशियन कारखानदारीचा दर्जा

भारतामधील औद्योगिक व शेतीविषयक प्रतिनिधींचें एक मंडळ रशियाचा दौरा करून परत आलें. प्रतिनिधि-मंडळांतील एक सभासद श्री. शं. ल. किर्लोस्कर ह्यांनीं रशियांत तयार होणाऱ्या मालाविषयीं पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहे. ते म्हणतात कीं, रशियन कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालाबद्दल खात्री देतां येत नाहीं. त्यामुळें भारतानें रशियाकडून माल घेण्याचा विचार फारसा गंभीरपणें करूं नये. रशियाखेरीज इतर देशांकडून जें उत्पादन-तंत्र भारताला घेतां येईल त्या पलीकडे वेगळें असें तंत्र रशियांत आढळत नाहीं. रशियन कारखाने त्यांना गलिच्छ दिसले. हत्यारें निष्काळजीपणानें अव्यवस्थित रीतीनें ठेवलेलीं आढळलीं. सूक्ष्म प्रकारचीं कामें करणारी नाजूक यंत्र-सामुग्री अतिशय हलगर्जीपणानें बाजूला पडलेली दिसून आली. रशियांतील कारखान्यांत उत्पादन चांगलें होतें हें मात्र खरें आहे. कारखान्याचे डायरेक्टर्स आणि कामगार अधिक उत्पादन करण्यासाठीं झटून काम करतांना दिसतात. सामान्यपणें पहातां रशियांतील कारखाने जुन्या पद्धतीचेच दिसले. पण ह्याचा अर्थ अद्यावत् पद्धतीचे कारखाने तेथें नाहींत, असा नाहीं. एका पोलादाच्या कारखान्यांतील यंत्रसामुग्री अमेरिकन होती. कारखान्यांच्या प्रमुख चालकांनीं उत्पादन प्रत्यक्ष वाढवून दाखविलें नाहीं तर त्यांना कामावरून दूर करण्यांत येतें. रशियांतील लोकांना रोज लागणाऱ्या वस्तूंसाठीं फार किंमती द्याव्या लागतात. सामान्य कामगार व डायरेक्टर ह्यांच्या वेतनांत बरीच तफावत दिसते. कामगाराला दरमहा ४०० रुबेल्स तर डायरेक्टरला दरमहा १८,००० रुबेल्सहि पगार असतो.


# किर्लोस्कर

## 'कल्याण' पॉवर शेंगायंत्र



हें यंत्र चालविण्यास ६/- अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.

याशिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

**किर्लोस्कर बंधु लि.**

किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

पच. पस. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २६ जानेवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## क्रमप्राप्त, म्हणून स्वागतार्ह

### रूरल क्रेडिट सर्व्हे : अहवाल व शिफारसी

रिझर्व्ह बँकेच्या वतीनें करण्यांत आलेल्या शेती पतव्यवस्थेचा पहाणीचा दुसरा भाग (सर्वसाधारण अहवाल) प्रसिद्ध झाला, तेव्हां त्यांतील शिफारसींचें "धाडसी व दूरगामी" असें वर्णन 'अर्था'च्या २९ डिसेंबरच्या अंकांत आम्हीं केलें होतें. खेडे-गांवांतील आजच्या व्यवस्थेच्या जागीं सहकारी व्यवस्था आणणें व त्यासाठीं मोठमोठ्या सरकारी व निम-सरकारी, सहकारी संस्था स्थापणें, हें रिझर्व्ह बँकेच्या 'कमिटी ऑफ डायरेक्शन ऑन रूरल क्रेडिट'च्या (गोरवाला कमिटीच्या) शिफारसींचें सार आहे. सरकारी नियंत्रणाखालील व भागीदारींतील सहकारी संघटना यशस्वी होण्यापूर्वी चालू घडीस मोठा धक्का मिळणें कितपत इष्ट होईल, ह्याविषयींहि आम्हीं साशंकता व्यक्त केली होती. ग्रामीण आर्थिक परिस्थिति सुधारण्यास अशा भगीरथ प्रयत्नांखेरीज दुसरा उपाय उरलेला दिसत नाहीं, असाच कमि-टीच्या शिफारसींचा अर्थ आम्हीं लावला होता.

सहकारी चळवळीचे नेते व निस्सीम कार्यकर्ते श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं 'टाइम्स' वृत्तपत्रांतील आपल्या लेखांत कमिटीच्या शिफारसींचें केलेलें समर्थन उद्बोधक वाटेल. "जमिनदारी पद्धतीचें उच्चाटण, मालक व खंडकरी ह्यांच्यामधील संबंधाचें नियमन, शेतकऱ्यांच्या कर्जाची तडजोड, सावकारीचें नियंत्रण, ह्या सर्व सुधारणा ह्यापूर्वींहि केल्या गेल्या असत्या, तरी इष्टच झालें असतें. पण आतां, सरकारनें त्याबाबत आवश्यक ते कायदे केले असून कसून अंमलबजावणी करण्याचा त्याचा मानस आहे. ह्या सर्व गोष्टींचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षांत घेऊन, निर्माण होणाऱ्या परिस्थितीस योग्य असें धोरण अंगिकारणें सरकारला पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनें क्रमप्राप्त झालें आहे. कमिटीनें सुचविलेल्या दूरगामी उपाययोजनेचें समर्थन मुख्यतः ह्याच युक्तिवादानें करितां येईल."

कमिटीच्या सूचना अंमलांत आणण्याची प्रत्यक्ष जबाबदारी कमिटीनें सरकारवर टाकलेली नाहीं. स्थानिक, सहकारी संस्थां-मार्फत काम करणाऱ्या, संबंधित लोकांच्या हार्दिक व प्रत्यक्ष सहकार्यानेंच योजनांची अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा आहे. अत्यावश्यक आर्थिक उपक्रमांत, सरकार आणि लोक ह्यांच्या भागीदारीचा तो एक नवा प्रकार आहे. कमिटीनें आखून दिलेलें धोरण, हें भारतांत गेलीं पन्नास वर्षे चालू असलेल्या धोरणास कलाटणी देणारें आहे. आजवरचें सरकारी धोरण, भारतांत खरीखुरी सहकारी चळवळ दृढमूल करण्याचें होतें; ती चळवळ स्वावलंबी व्हावी अशी अपेक्षा होती. बिन-सरकारी सहकारी पुढाऱ्यांचेंहि तसेंच मत होतें. आजहि, मॅकलॅगन कमिटीनें नमूद केलेल्या तत्त्वांचाच पुरस्कार करणारे असंख्य सहकारी कार्यकर्ते व सहकारी अधिकारी सांपडतील. सरकारी मदत व हस्तक्षेप ह्यांस सतत विरोध करण्यांत आलेला आहे. सहकारी तत्त्वांबद्दल इतकी आपुलकी बाळगण्यांत आली, तरी प्रत्यक्ष आचारांत मात्र त्यांना मुरड घालणें कित्येकदां भाग पडत असे. सरकारच्या आर्थिक मदतीनें ग्रामीण कर्जपुरवठ्याची योजना मुंबईसरकारनें अंमलांत आण-ण्याचें ठरविलें, तेव्हां सहकारी चळवळीच्या तत्त्वच्युतीबद्दल किती तरी गवगवा झाला होता.

कमिटीनें आपल्या सूचना करतांना कोणतेहि तात्त्विक दृष्टि-कोन किंवा कारभारविषयक ग्रह आड येऊं दिलेला नाहीं; अशा निर्माण करणारी धाडसी वृत्ति कमिटीनें दर्शविली आहे. पहाणींत आढळलेल्या वस्तुस्थितीचा तो स्वाभाविक आविष्कार आहे. सत्तर वर्षे सरकार शेतकऱ्यांना कर्जे देत आलें आहे व पन्नास वर्षे सहकारी चळवळहि त्याच प्रयत्नांत आहे. तथापि, त्या बाबतींत प्रत्यक्ष प्रगति पाहिली, तर निराशाजनक आहे; आणि राज्यवार आकडे तपासले तर दिसणारी तफावत भयानक आहे. त्यामुळें सहकारी चळवळीच्या प्रत्येक टप्प्यांत सरकारची भागीदारी असावी हें तत्त्व क्रमानेंच मान्य करण्याची पाळी येते. शेतकऱ्यांच्या कर्ज-पुरवठ्याच्या सध्यांच्या पद्धतीवर कितीहि नियंत्रणें बसविलीं, तरी उत्पादनाच्या वाढीस किंवा न्याय्य वाटणीस पोषक अशी प्रगति घडवून आणण्याचें सामर्थ्य तिचेमध्यें येणार नाहीं. कमिटीनें हें लक्षांत घेऊन आणि कर्जपुरवठ्याच्या इतर योजनांची पहाणी करून त्या सर्व त्याज्य ठरविल्या आहेत. फुटकळ प्रयत्नांनीं परिस्थिति सुधारण्याजोगी नाहीं; व्यापक अशा भरभक्कम राष्ट्रीय पायाचा उत्पादक शेतकऱ्यांना आधार दिल्याविना त्यांची पत सुधारणार नाहीं, हें कमिटीच्या सूचनांचें सूत्र आहे. सरकारची आणि मध्य-वर्ती बँकेची आर्थिक शक्ति, ह्यांचें पाठबळ शेतकऱ्यांच्या उत्पादनास मिळालें पाहिजे, असा कमिटीचा आग्रह आहे. परंतु, त्याबरोबर सरकारचें नियंत्रण व दिग्दर्शन ह्यांत वाढ व्हावी, अशी प्रत्यक्ष सूचना तिनें केलेली नाहीं.

कमिटीच्या शिफारसींवरील श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा हा अभिप्राय सहकारी कार्यकर्त्यांना विशेष महत्त्वाचा वाटेल. पन्नास वर्षांच्या प्रयत्नांनीं फारच थोडी प्रगति झालेली आहे आणि शेतकऱ्यांच्या कर्जपुरवठ्याचा प्रश्न स्वावलंबी सहकारी चळवळी-मार्फत सुटण्याचा संभव दिसत नाहीं. दुसरी कोणतीहि उपाय-योजना व्यवहार्य वाटत नाहीं. सरकारनें ग्रामीण अर्थव्यवस्थेंत हस्तक्षेप केलेला आहे, तेवढ्यानें सरकारची जबाबदारी संपत नाहीं. अधिक उपकारक असें धोरण अंगिकारून त्याची अंमल-बजावणी करण्याचें धोरण अंमलांत आणणें क्रमप्राप्तच झालें आहे. त्याच्यासाठीं कोणत्याहि नव्या युक्तिवादाची आवश्यकता उरलेली नाहीं व त्या युक्तिवादाचा उपयोग होणार नाहीं. प्राप्त परिस्थितीचा तो सरळ परिणाम आहे. ह्या दृष्टीनेंच गोरवाला कमिटीच्या शिफारसींकडे पाहिलें पाहिजे. पण, त्या शिफारसींची अपरिहार्यता मान्य करणें म्हणजे त्यांच्या व्यावहारिक यशाची खात्री देणें, असा मात्र अर्थ होत नाहीं. शिफारसी प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं भगीरथ प्रयत्नांची आवश्यकता आहे आणि अशा प्रयत्नांस सहकारी कार्यकर्त्यांनीं मनापासून हातभार

लावावा, अशीच अपेक्षा आहे. केवळ दुरून पहात राहिल्यानें हा नवा प्रयोग यशस्वी होण्यास मदत होणार नाहीं, हें उघड आहे.

### शेतकऱ्यांच्या कर्जांचा पुरवठा

| कर्ज कोण देतो ? | एकूण कर्जाशीं प्रमाण |
|---|---|
| | % |
| सरकार | ३·३ |
| सहकारी संस्था | ३·१ |
| नातेवाईक | १४·२ |
| जमीन–मालक | १·५ |
| शेतकरी सावकार | २४·९ |
| धंदेवाईक सावकार | ४४·८ |
| व्यापारी व कमिशन एजंट | ५·५ |
| व्यापारी बँका | ०·९ |
| इतर | १·८ |
| एकूण | १००·० |

## शेतकऱ्यांना कर्जपुरवठा

### सरकार व रिझर्व्ह बँक ह्यांवरील जबाबदारी

ॲग्रिकल्चरल क्रेडिटची रिझर्व्ह बँकेची सल्लागार समिति आणि सहकारी शिक्षणाची मध्यवर्ती सरकारची मध्यवर्ती समिति ह्यांची संयुक्त सभा मुंबई येथें भरविण्यांत आली होती. तिनें गोरवाला कमिटीनें सुचविलेल्या, सहकारी क्षेत्रांतील सरकारी भागीदारीस पाठिंबा दिला. सहकारी बँका व सोसायट्या ह्यांच्या दैनंदिन कारभारांत सरकारनें हस्तक्षेप करूं नये, असा इशाराहि तिनें दिला. सहकारी संस्था व त्यांचे सभासद ह्यांचेमधील जबाबदारीची व स्वावलंबनाची भावना नष्ट होऊं नये, अशा बेतानें सरकारची भागीदारी असावी, असेंहि सभेनें सुचविलें. शेतकऱ्यांचा कर्जपुरवठा त्यांच्या इतर आर्थिक व्यवहारांशीं निगडित असावा, विशेषतः कच्च्या मालाचें विक्रीसाठीं रूपांतर व प्रत्यक्ष विक्री ह्यांचा उत्पादनाच्या इतर अंगांशीं संबंध असावा, ह्याकडे सभेनें विशेष लक्ष वेधलें. नियोजित स्टेट बँक ऑफ इंडियाचें सभेनें स्वागत केलें व तिचें कार्य सहकारी लहान–मोठ्या बँकांशीं योग्य प्रकारें जोडलें जाईल, अशी आशा व्यक्त केली. स्टेट बँकेमुळें सहकारी बँकांच्या ठेवींवर प्रतिकूल परिणाम होणार नाहीं, अशी दक्षता बाळगण्याचें महत्त्व सभेनें प्रतिपादन केलें. गोरवाला कमिटीच्या शिफारशींमुळें रिझर्व्ह बँकेवरील जबाबदारी वाढणार आहे, ह्या दृष्टीनें बँकेंतील ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें अधिक मजबूत व कार्यक्षम करण्याची जरूरी सभेनें व्यक्त केली.

**आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सव**—फ्रान्समधील कॅने ह्या गांवीं आंतरराष्ट्रीय चित्रपटांचा वार्षिक महोत्सव ता. २६ एप्रिलपासून १० मे पर्यंत भरविण्यांत येणार आहे. ज्या देशांतील चित्रपटांचें वार्षिक उत्पादन १०० पेक्षा अधिक आहे, त्यांना महोत्सवांतील, स्पर्धेसाठीं दोन चित्रपट धाडतां येतील. इतर देशांना एकच बोलपट पाठवितां येईल.

**गुजरातेंत ७ नवीन कॉलेजें**—येत्या जून महिन्यांत गुजरातेंत ७ नवीन कॉलेजें उघडण्यांत येणार आहेत. त्यांत जामनगर येथें उघडण्यांत येणारें मेडिकल कॉलेज आहे. ४ कॉलेजें अहमदाबाद शहरांत निघतील. भडोच येथें पहिलेंच आर्टस कॉलेज व राजकोट येथें लॉ कॉलेज सुरू करण्यांत येईल.

### सोलापूर येथील सहकारी परिषद्

सोलापूर येथील मुंबई राज्य सहकारी परिषद् २, ३ व ४ एप्रिल, १९५५ रोजीं श्री. के. डी. मालवीय, मध्यवर्ती सरकारचे नैसर्गिक संपत्ति खात्याचे मंत्री, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. श्री. बा. गं. खेर हे परिषदेचें उद्घाटन करतील. परिषदेंत चर्चेसाठीं सहा विषय नियुक्त करण्यांत आले आहेत. परिषदेचा एक भाग म्हणून स्त्री–विभाग, आनंद येथील परिषदेप्रमाणें, केला जाईल. इन्स्टिट्यूटचे सभासद हे परिषदेस प्रतिनिधि म्हणून जाऊं शकतील. सभासद्–सोसायटींस एकच प्रतिनिधी पाठवितां येईल, व त्याचें नांव इन्स्टिट्यूटकडे २८ फेब्रुआरी, १९५५ पूर्वी कळविलें पाहिजे. प्रेक्षक म्हणून इतरांना हजर रहातां येईल. त्यांचीं नांवें व प्रत्येकीं ५ रु. वर्गणी इन्स्टिट्यूटकडे फेब्रुवारीपूर्वी पोंचणें जरूर आहे. प्रेक्षकांना चर्चेत भाग घेतां येईल, पण मत देतां येणार नाहीं.

### शारदा कायद्याच्या जनकाचा मृत्यु

'चाइल्ड मॅरेज रिस्ट्रेन्ट बिल' असेंब्लीमध्यें मांडून, पुराणमतवादी हिंदु मताच्या विरोधाला यशस्वी रीतीनें तोंड देणारे शारदा कायद्याचे जनक, श्री. सारडा हे वयाच्या ८८ व्या वर्षी अजमीर येथें मृत्यु पावले. ह्या कायद्यानें १४ वर्षांखालील मुली व १८ वर्षांखालील मुलगे ह्यांच्या विवाहास बंदी केली. सती बेकायदा केल्यानंतर, सामाजिक सुधारणेची इतक्या महत्त्वाची दुसरी मोठी कायदेशीर योजना झालेली नाहीं, असें मत व्यक्त केलें जातें. जज्ज म्हणून त्यांनीं सरकारी नोकरी केल्यानंतर ते सेवानिवृत्त झाले व असेंब्लींत तीनदां निवडून आले.


WILICO

—अपूर्व यश—

★ वेस्टर्ननें १९५४ सालीं चार कोटींवर नवीन काम पूर्ण केलें

व

★ सव्वा कोटीचें अधिक काम मिळवून कामवाढीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला.

★ आपल्या कुटुंबियांच्या सौख्याकरतां असलेल्या विम्यांचें नियोजन आम्ही आपणांस आनंदानें करून देऊं.

अधिक माहितीकरतां शाखाधिकाऱ्यांना आजच भेटा अगर लिहा.

—फोन नं. ३४०१—

वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हौस, लक्ष्मी रस्ता, पुणें २

## पंचवार्षिक योजनेच्या खर्चांत परकीय साह्याचें स्थान

पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभापासून भारतास मित्रराष्ट्रांकडून साह्य मिळालें आहे. जुलै १९५४ पर्यंत अशा प्रकारचें अधिकृत साह्य एकूण २३६·७ कोटी रु. आहे. म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेचा एकूण खर्च २२४० कोटी रुपये असतांना, योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत प्रत्यक्ष मिळालेल्या वा आश्वासित परकीय साह्याचें प्रमाण १० टक्क्यांहून किंचित् जास्त एवढें आहे. हें साह्य कर्ज व आर्थिक मदत अशा दोन्ही स्वरूपांतील आहे, त्यापैकी कर्जाच्या रकमेचा आंकडा सुमारें ११७·४ कोटी रुपये आहे.

आर्थिक साह्याच्या स्वरूपांतील मदत प्रामुख्यानें अमेरिकन सरकारकडून मिळाली. देशांत उपलब्ध नसलेली परंतु विकास कार्यांसाठी जरूर असणारी खास यंत्रसामुग्री व वस्तूंचा पुरवठा या स्वरूपांत कोलंबो योजनेनुसार परकीय मदत मिळाली. याशिवाय भारतांतील कांहीं विकासयोजनांसाठी तंत्रज्ञ पाठविणें व परदेशांत भारतीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणें, याहि स्वरूपांत मदत देण्यांत आली.

अमेरिकन सरकारनें जून १९५४ पर्यंत आर्थिक साह्यादाखल सुमारें ८१·४३ कोटी रुपये भारतास दिले आहेत. या निधीचा विनियोग विविध योजनांसाठी करण्याबाबत उभय सरकारांत स्वतंत्र करार करण्यांत आले. अमेरिकन सरकारनें १९५४–५५ सालीं विकासयोजनांसाठी भारतास देण्याकरितां सुमारें २८·३३ कोटि रु. व तांत्रिक साह्य दिलें.

कानडा सरकारनेंहि १९५३–५४ पर्यंत सुमारें १९·१० कोटी रुपये साह्यादाखल दिले. ही मदत अंशतः गव्हाचा पुरवठा करून व अंशतः मुंबई राज्यांतील एस. टी. साठी ट्रक व इंजिनें आणि भारतीय रेल्वेसाठी बॉयलर पाठवून करण्यांत आली. गहूं, ट्रक व इंजिनें यांच्या विक्रींतून मिळालेल्या पैशाचा उपयोग विकासयोजनांसाठी करण्यांत येत आहे. १९५४–५५ मध्यें कानडाकडून भारतास सुमारें ७ कोटी रु. साह्य मिळेल.

ऑस्ट्रेलियाकडूनहि पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत गहूं व यंत्रसामुग्रीच्या स्वरूपांत ७·२७ कोटी रुपये साह्य मिळालें असून १९५३–५४ मधील साह्याचा निश्चित आंकडा ठरला नसला तरी आणखी मदत देण्याचें त्या देशाच्या सरकारनें मान्य केलें आहे. याशिवाय न्यूझीलंडनें १० लक्ष पौंड व नॉर्वे सरकारनें २ कोटी नॉर्वेजियन क्रोनेड (सुमारें ६७ लक्ष रुपये) साह्यादाखल दिले आहे. अमेरिकेच्या फोर्ड फाउंडेशननें भारतास बरेंच साह्य केलें आहे. अशा प्रकारें या संस्थेनें आतांपर्यंत एकूण सुमारें २·३८ कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता दिलेली आहे. ही रकम समाज विकास योजनांतील नोकरवर्गाचें शिक्षण, समाजशिक्षण, आरोग्य, इत्यादी क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या शिक्षणाच्या योजना वगैरे कामासाठी वापरण्यांत येत आहे.

---

### आचार्य विनोबाजींची अमेरिकन शिष्या

आचार्य विनोबा भावे व त्यांचें कार्य ह्याचा अभ्यास करण्यासाठी कु. नॅन्सी स्नायडर ही अमेरिकन प्राध्यापिका भारताकडे येण्यास निघाली आहे आचार्यांच्या बरोबर ती पायीं प्रवास करील. अमेरिकेला परत गेल्यावर ती मिशिगन विद्यापीठांत पुनः इंग्रजी शिकविण्याचें काम सुरू करील.

---

### कै. प्रो. वा. गो. काळे यांचे पुण्यस्मृतीस

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वामन गोविंद काळे, यांचे निधनास २७ जानेवारी १९५५ रोजीं ९ वर्षे पूर्ण होतील. यानिमित्त त्यांचे पुण्यस्मृतीस स्मरणपूर्वक शब्दसुमनांजलि अर्पण करणें योग्य आहे. कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं शैक्षणिक कार्याबरोबरच अर्थ व औद्योगिक प्रश्नासंबंधीं सखोल विचार करून त्या दृष्टीनें विधायक असें कार्य केलें. आर्थिक प्रश्नासंबंधी ग्रंथनिर्मिती केली व त्याबरोबरच सहकारविषयक मोठी कामगिरी केली. सहकारी कार्यक्षेत्रांत त्यांनीं पहिल्या महायुद्धाचे काळांत ग्राहक संस्था काढण्याचे प्रयत्न केले व पुढें ग्रामीण सहकारी चळवळीमध्यें प्रत्यक्ष पुढाकार घेऊन त्याबाबत सतत मार्गदर्शन केलें. सहकारी चळवळीबरोबरच महाराष्ट्रांतील संयुक्त भांडवली बँकांचा भरभक्कम पाया रचण्याचे बाबत त्यांनीं पुढाकार घेतला. त्याचा दृष्ट परिणाम म्हणजेच पहिल्या महायुद्धानंतर महाराष्ट्रांची अशी एकहि बँक नव्हती, परंतु पुढें महाराष्ट्राच्या अशा नामवंत बँक स्थापन झाल्या व त्या आज योग्य असें काम करीत आहेत. संयुक्त भांडवली बँका व सहकारी बँका या एकमेकांस पूरक आहेत असें त्यांनीं मनांत योजल्यामुळेंच वरील दोन्ही संस्था-चालकांत परस्पर असें सहकार्य होतें. सहकारी चळवळीची गेल्या महायुद्धानंतर पुनर्घटना झाली व त्यामध्यें आणखी पुनर्घटना होण्याचा संभव दिसत आहे. नुकत्याच शेत पत पाहणीच्या अहवालांत यासंबंधीं सूचना आहेत, त्यापैकीं कांहीं मूलभूत सहकारी तत्त्वाशीं क्रांतिकारक फरक सुचविणाऱ्या आहेत. अशावेळीं निर्भिड परंतु योग्य असे विचार मांडणारे विचारवंत हवेत. आज जर कै. प्रो. वा. गो. काळे असते तर त्यांनीं योग्य असें मार्गदर्शन केलें असतें. कै. काळे यांची सहकारी चळवळींतील कामगिरी इतकी मोठी व अविस्मरणीय आहे कीं ज्या ज्या वेळीं सहकारी चळवळीसंबंधीं महत्त्वाचे प्रश्न कार्यकर्त्यांपुढें उभे राहतात त्या त्या वेळीं त्यांचें स्मरण झालेशिवाय राहत नाहीं.

—य. दृ. खोले.

### सह्याद्रि विमा कंपनी—शाखाधिकाऱ्यांची परिषद्

सह्याद्रि इन्शुरन्स कं. लि., नाशिक, या संस्थेच्या शाखाधिकाऱ्यांची परिषद दरवर्षीप्रमाणें मागील वर्षाचे कामाचा आढावा घेणेसाठी व नवीन वर्षाचे कामाची योजना ठरविणेसाठी ता. १७ ते १९ जानेवारी १९५५ पावेतों नाशिक येथें कंपनीचे मुख्य कचेरींत भरली होती. सदर प्रसंगीं कारवार ते दिल्ली व मुंबई ते नागपूरपर्यंत ठिकठिकाणीं असलेल्या सर्व शाखांचे अधिकारी उपस्थित होते. परिषद् यशस्वी रीतीनें पार पडली. त्याच प्रसंगीं कंपनीचे मॅ. डायरेक्टर श्री. गो. ग. सौंदणकर बी. ए. हे इंडियन लाईफ अॅशुरन्स ऑफिसेस असोसिएशन मुंबई या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचें सभासद म्हणून नियुक्त झाल्याबद्दल त्यांचें सर्व कार्यकर्त्यांतर्फे अभिनंदन करण्यांत आलें यामसंगीं कंपनीचे एक संचालक श्री. डी. एस्. वाघ, कॉन्ट्रॅक्टर नाशिक यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. सदरहू समारंभास कंपनीचें फायनान्स मॅनेजर श्री. वा. का. जोशी हेड-ऑफिस स्टाफ व सर्व प्रचाराधिकारी हजर होते.

### कुलाब्यांतील शिलोत्री हक्क नष्ट होणार

मुंबई राज्यांत कुलाबा जिल्ह्यांत अस्तित्वांत असलेले शिलोत्री हक्क नष्ट करणारें बिल मुंबई सरकाच्या ता. १४ जानेवारीच्या ज़ादा गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे. कुलाबा जिल्ह्यांतील कांहीं शिलोत्रीदारांना लागवडीसाठीं आणलेल्या खार जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्याकडून "शिलोत्री मान" म्हणून थोडा भात वसूल करण्याचा पूर्वापार हक्क आहे. पूर्वी खार जमिनी लागवडी-खालीं आणण्यासाठीं केलेल्या प्रयत्नांबद्दल हा हक्क देण्यांत आला होता. तथापि धरणें, बंधारे, वगैरेंची दुरुस्ती करण्याची कोणतीच जबाबदारी शिलोत्रीदारावर नसते. यामुळें "शिलोत्री मान" देण्याचा शेतकऱ्यांवर निष्कारण भार पडतो. म्हणून शिलोत्री-दाराचे शिलोत्री हक्क नष्ट करण्याची आणि "शिलोत्री मान" देण्याच्या जबाबदारींतून शेतकऱ्याला मुक्त करण्याची सरकारनें या बिलांत तरतूद केली आहे. तसेंच, या शिलोत्रीदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतहि तरतूद करण्यांत आली आहे.

---

### इंपीरिअल बँकेच्या राष्ट्रीयीकरणास भागीदारांचा विरोध

इंपीरिअल बँकेच्या भागीदारांची सभा ३१ मार्च, १९५५ रोजीं भरविण्यांत येणार आहे. बँकेच्या नियंत्रणाबाबत भारत सरकारच्या योजनेचा त्या सभेंत विचार होईल. सर्व बँकांपैकीं एकादीच बँक राष्ट्रीयीकरणासाठीं निवडणें म्हणजे बँका-बँकांत भेदाभेद करणें होय व ती गोष्ट घटनेस सोडून होईल, असें कांहीं भागीदारांचें मत आहे. ह्या मतास मुंबईच्या एका माजी ॲड-व्होकेट जनरलचा पाठिंबा आहे; त्याच्या मतें इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्याचे आधीं घटनेंत दुरुस्ती करावी लागेल. सर-कारच्या निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टाकडे जाण्याची कांहीं भागी-दारांची तयारी आहे.

---

### इंपीरिअल बँक ऑफ इंडिया

वरील बँकेस ३१ डिसेंबर अखेर संपलेल्या सहामाहींत ६८·५४ लक्ष रु. नफा झाला. १६% डिव्हिडंड कायम राखलें आहे.

---

### बँक ऑफ बरोडा लि.

१९५२ मध्यें वरील बँकेस २८·०१ लक्ष रु. नफा झाला. १९५३ पेक्षा हा नफा ६·५६ लक्ष रुपयांनीं ज्यास्त आहे. १०% डिव्हिडंड + १ रु. बोनस कायम राखलें आहे.

---

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५४ मध्यें ३०·५९ लक्ष रु. नफा झाला. भागीदारांना ५% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

---

### अहमदनगर येथें शिक्षणवर्ग

औद्योगिक सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग, जिल्हा सहकारी बोर्डाचे वियमानें, नगर येथें ता. २६ जानेवारी-पासून सहा आठवडे चालविला जाणार आहे. तरी औद्योगिक सोसायट्यांच्या चालकांनीं आपल्या नोकरवर्गास ह्या शिक्षणाचा फायदा घेण्याची संधि द्यावी. इतरांनाहि ह्या वर्गाचा फायदा घेतां येईल.

---


५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान.

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सांडू

प्रेग-यूटेरो

गर्भिणी-गर्भ-रक्षक



दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.

चेंबूर-मुंबई

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गिरगांव, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### मध्यप्रदेशांतील क्षयरोग्यांची व्यवस्था

मध्यप्रदेशाचे आरोग्यमंत्री श्री. एम्. एस्. कन्नमवार ह्यांनीं नागपूर मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्यें क्षयरोग्यांना औषधोपचार करण्यासाठी दोन दालनें नुकतींच खुलीं केलीं. प्रत्येक दालनांत क्षयरोग्यांसाठी २५ खाटा ठेवण्यांत आल्या आहेत. क्षयरोग्यांसाठी आतां नागपुरांतील इस्पितळांत १७५ खाटा झाल्या आहेत. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. कन्नमवार म्हणाले कीं, मध्यप्रदेशांत क्षयरोगानें पछाडलेले सुमारें ५,००,००० तरी लोक असावेत. त्यापैकी ३,००० रोगी दरवर्षी दगावतात, असा अंदाज आहे. पहिला पंचवार्षिक कार्यक्रम पूर्ण झाल्यावर सरकारी इस्पितळांतून जास्तींत जास्त १,००० क्षयरोग्यांची सोय होऊं शकेल. क्षयरोग्यांची संख्या लक्षांत घेतां ही सोय अपुरी आहे हें उघडच आहे. ज्यांची सोय सरकारी इस्पितळांत होऊं शकणार नाहीं त्यांना खाजगी रीत्याच औषधोपचार करून घ्यावा लागेल. क्षयरोगापासून बचाव कसा करावा हें लोकांना शिकवण्यासाठा आरोग्यविषयक शिक्षणाची फार जरूरी आहे. राज्यांतील जिल्ह्या–जिल्ह्यांतून क्षयरोगाला आळा घालण्यासाठीं बिन-सरकारी संघटना उभारण्यांत आल्या पाहिजेत. ह्या संघटनांनीं जरूर तो पैसा गोळा करण्याचें कार्यहि आपल्या अंगावर घेतलें पाहिजे. सध्यां सरकार प्रत्येक क्षयरोग्यावर सुमारें ५०० रुपये खर्च करीत असतें. क्षयरोगाविरुद्ध उपाययोजना करणाऱ्या खाजगी संस्थांनाहि. कांहीं प्रमाणांत मदत देण्याची सरकारची तयारी आहे, असेंहि त्यांनीं सांगितलं. नागपूर सारख्या मोठ्या शहरांत क्षयरोग्यांना उपचार करण्यासाठी अवघ्या १७५ खाटा असव्यात, ह्यावरून भारतांत ह्या बाबतींत किती मोठें कार्य अद्याप करावयाचें आहे तें समजतें.

---

### हिराकूड धरणावर उत्पन्न होणारी वीज

हिराकूद धरणाच्या कामावरील मुख्य एंजिनिअर श्री. अय्यंगार ह्यांनीं धरणाच्या कामाविषयीं एक अहवाल पार्लमेंटच्या पब्लिक अकौंटस् कमिटीला सादर केला आहे. १४ सभासद असलेल्या ह्या कमिटीनें धरणाच्या कामाला ९ जानेवारीला मुद्दाम भेट दिली. हिराकूद धरणाच्या कामाचा पहिला टप्पा ऑगस्ट, १९५६ पर्यंत पुरा होऊन विजेच्या उत्पदनाला प्रारंभ होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. सर्वच्या सर्व योजना १९६७ च्या सुमारास पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. धरणाच्या पाण्यामुळें संबळपूर आणि बोलानगीर ह्या दोन जिल्ह्यांतील सुमारें ६,५०,००० एकर जमिनीला प्रथम पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. नंतर पाणी-पुरवठ्याचें क्षेत्र आणखीहि वाढवितां येईल. श्री. अय्यंगार आपल्या अहवालांत म्हणतात, कीं गेल्या दोन वर्षांत योजनेवरील कामांत उत्तम प्रगति झाली आहे. सिमेंट कॉंक्रीटच्या ऐवजीं सिमेंट चुन्याचा उपयोग करूं लागल्यामुळें कामाची गति वाढली आहे आणि त्याचबरोबर खर्चांतहि बचत झाली आहे. नोव्हेंबर १९५४ पर्यंत ह्या योजनेवर सरकारनें एकूण ३५,८९,००,००० रुपये खर्च केले आहेत. ह्या रकमेपैकी ४,३३,००,००० रुपये १९५४-५५ सालांत जें काम करावयाचें ठरलें होतें त्यावर खर्च करण्यांत आले. १९५५-५६ सालांत जें काम करावयाचें आहे त्यावर होणाऱ्या खर्चाचा अंदाज १७,३८,००,००० रुपये आहे. श्री. अय्यंगार ह्यांनीं पार्लमेंटच्या पब्लिक अकौंटस कमिटीला अहवाल सादर केला, ही घटना भारताच्या लोकशाही कार्यपद्धतीला धरूनच आहे. लोकांचा पैसा कसा वापरला जातो त्यावर लक्ष ठेवण्याची संधि लोकप्रतिनिधींना मिळणें उचितच आहे.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.**

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार प. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

स्थापना सन १९३५ — टे. न. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )

श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )

श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,

श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,

श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.

डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## जमीनधारापद्धति रद्द करण्यासंबंधीच्या कायद्याखालील नुकसानभरपाई

### तात्पुरत्या रोख रकमा देण्याबाबतची योजना

निरनिराळ्या प्रकारच्या जमीनधारा पद्धती रद्द करण्यासंबंधींचे कायदे व नियम यानुसार, अशा पद्धतीखालील जमिनी धारण करणाऱ्या इसमांना जी नुकसानभरपाई देण्यांत येणार आहे त्यांपैकी कांहीं रकमा रोख देण्याबाबतची योजना मुंबई सरकारनें आंखली आहे. सदरहू कायद्याखाली व नियमाखाली त्यांना द्यावयाचे बाँड देण्यांत येईपर्यंत दरसाल त्यांना अशी रक्कम देण्यांत येईल. तथापि, अशा प्रकारें देण्यांत येणाऱ्या रोख रकमा या त्यांना मिळणाऱ्या एकूण नुकसानभरपाईचा भाग म्हणून स्वीकारण्यास संबंधित इसमांनीं मान्यता दिली तरच वरीलप्रमाणें त्यांना त्या देण्यांत येतील.

### सध्यां अंमलांत असलेले कायदे

खालीं दिलेले कायदे सध्यां मुंबई राज्यांत अंमलांत असून सदरहू कायद्याखाली व नियमाखाली ज्यांचे जमिनीबाबतचे खास हक्क रद्द झाले असतील अशांना दुसऱ्याच्या नांवें बदलून देतां येणाऱ्या बाँडच्या स्वरूपांत कांहीं नुकसानभरपाई देण्याबाबतची तरतूद करण्यांत आली आहे.

१८४९ चा बाँबे मालकी टेन्युअर अॅबॉलिशन अॅक्ट; १९४९ चा बाँबे तालुकदारी टेन्युअर अॅबॉलिशन अॅक्ट; १९४९ चा बाँबे खोती अॅबॉलिशन अॅक्ट; १९५० चा बाँबे वतन वाजिफदारी राईट अॅबॉलिशन अॅक्ट; १९५० चा बाँबे परगाणा अँड कुलकर्णी वतन्स अॅबॉलिशन अॅक्ट; १९५१ चा सालेटी एस्टेट्स् (लँड रेव्हेन्यू एक्झम्प्शन) अॅबॉलिशन अॅक्ट; १९५२ चे बाँबे सरंजाम जहागिर्स अँड अदर इनाम्स ऑफ पोलिटिकल नेचर रिझम्प्शन रूल्स; १९५२ चा बाँबे पर्सनल इनाम्स अॅबॉलिशन अॅक्ट; १९५३ चा बाँबे मर्जड टेरिटरीज (आंकडिया टेन्युअर अॅबॉलिशन) अॅक्ट; १९५३ बाँबे मर्जड टेरिटरीज् बरोडा मुळगिरास टेन्युअर अॅबॉलिशन) अॅक्ट; १९५३ चा बाँबे मर्जड टेरिटरीज् (बरोडा वतन अॅबॉलिशन अॅक्ट; १९५३ चा बाँबे मर्जड टेरिटरीज् मतादारी टेन्युअर अॅबॉलिशन अॅक्ट; १९५३ चा बाँबे सर्व्हिस इनाम्स (युसफुल टु कम्युनिटी) अॅबॉलिशन अॅक्ट; १९५३ चा बाँबे मर्जड टेरिटरीज् (जंजिरा अँड भोर) खोती टेन्युअर अॅबॉलिशन अॅक्ट; आणि १९५४ चे सर्व्हिस इनाम्स युसफुल टू कम्युनिटी (गुजरात अँड कोंकण) रिझम्प्शन रूल्स.

कायद्यांत नमूद केलेले बाँड देण्यापूर्वी कांहीं प्राथमिक तयारी करावी लागते, पण बदलून देतां येण्याजोगे बाँड देण्याच्या बाबतींत लागणाऱ्या विलंबामुळें होणारी गैरसोय दूर व्हावी म्हणून आगाऊ कांहीं रोख रक्कम देण्याबाबतची सध्यांची योजना आंखण्यांत आली आहे.

### कार्यपद्धति

या योजनेनुसार संबंधित कायद्याखाली मिळावयाची नुकसानभरपाईची रक्कम निश्चित झाल्यावर कलेक्टर संबंधित इसमास त्याप्रमाणें कळवितील व वरील योजनेचा त्याला फायदा घ्यावयाचा असल्यास त्याप्रमाणें त्यानें, ठराविक फॉर्मवर कलेक्टरांना अर्ज करावा, असेंहि त्यास कळविण्यांत येईल. हे फॉर्म कलेक्टरांच्या कचेरींत मोफत मिळूं शकतात. अशा प्रकारचे अर्ज आल्यावर व त्यांतील माहितीची छाननी केल्यावर अर्जदाराला तावडतोब किती रोख रक्कम द्यावयाची व संपूर्ण नुकसानभरपाईबाबतचे बाँड देण्यांत येईपर्यंत दरसाल किती रक्कम द्यावयाची, हें कलेक्टर ठरवितील. त्यानंतर ते अशा प्रकारची रोख स्वरूपांत नुकसानभरपाई देण्यासंबंधीं ट्रेझरी ऑफिसरांना हुकूम देतील व त्याची एक प्रत संबंधित इसमास पाठवितील. या हुकुमान्वयें संबंधित इसमास हुकुमांत नमूद केलेल्या ट्रेझरींतून वा सब–ट्रेझरींतून त्याला तावडतोब मिळणारी रक्कम चालू आर्थिक सालीं घेतां येईल. तसेंच बाँड मिळेपर्यंत दरवर्षी हुकुमांत नमूद केलेल्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर वार्षिक हप्त्याचीहि रक्कम त्याला वरील ठिकाणाहून घेतां येईल.

### किती रक्कम मिळेल

सर्वसाधारणपणें, नुकसानभरपाई दाखल मिळावयाच्या एकूण रकमेच्या ५ टक्के इतकी रक्कम दरसाल देण्यांत येईल आणि जे कायदे चालू आर्थिक सालापूर्वी अंमलांत आले असतील त्यांच्याबाबतींत, सदरहू कायदे जितकी वर्षे अंमलांत असतील तितक्या वर्षांची वरीलप्रमाणें होणारी रक्कम चालू सालच्या हप्त्याबरोबर चालू सालीं देण्यांत येईल. १९५० चा मुंबई परगणा व कुलकर्णी वतनें रद्द करण्यासंबंधींचा कायदा आणि १९५३ चा बडोदे वतनें रद्द करण्यासंबंधींचा कायदा या कायद्याखालील कांहीं प्रकरणांच्या बाबतींत नुकसानभरपाईची कांहीं रक्कम सरकारनें ताब्यांत घेऊन परत दिलेल्या जमिनींच्या बावतींत भराव्या लागणाऱ्या भोगवटद्याच्या किंमतींत वळती करण्यांत आली असेल किंवा येणार असेल, अशा बाबतींत, या योजनेखाली तावडतोब आणि सालिना ज्या रकमा द्यावयाच्या आहेत त्या नुकसानभरपाईच्या रकमेंतून भोगवट्याची किंमत वजा करून उरलेल्या रकमेच्या हिशेबानुसार देण्यांत येतील.

निरनिराळ्या खास जमीनधारा पद्धति रद्द करण्याबाबतच्या कायद्याखालील संबंधित इसमास मिळावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम कशी निश्चित करावयाची यासंबंधींची सविस्तर माहिती कलेक्टरांच्या कचेऱ्यांतून मिळूं शकेल.

नुकसानभरपाई देण्यासंबंधींच्या हुकुमानुसार मिळावयाची रक्कम ट्रेझरी व सब–ट्रेझरी ऑफिसर देतील.

बदलून देतां येण्याजोगे बाँड देण्याबाबतची प्राथमिक तयारी पूर्ण झाल्यावर ज्या इसमांना ते मिळावयाचे असतील त्यांना ते त्यांनीं आपल्याजवळील नुकसानभरपाईबाबतच्या रोख रकमा मिळण्यासंबंधींच्या हुकुमाच्या प्रती सादर केल्याशिवाय देण्यांत येणार नाहींत; आणि वरीलप्रमाणें बाँडची प्राथमिक तयारी पूर्ण झाल्यावर या योजनेनुसार रोख रकमा देण्याचें थांबविण्यांत येईल.

---

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५४ मध्यें ७७·८८ लक्ष रु. नफा झाला. १२% करमाफ डिव्हिडंड कायम आहे.

### दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी सल्लागार अर्थशास्त्रज्ञ

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आखणीचे कामीं नियोजन मंडळाला सल्ला देण्याकरितां त्या मंडळानें भारतांतील २० प्रमुख अर्थशास्त्रज्ञांना पाचारण केलें आहे. या सल्लागारमंडळांत प्रा. गाडगीळ, प्रा. वुरंजन, इत्यादींचा समावेश आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९९५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.